<u>पुढील सरतपास विधीज्ञ श्री.एन.ए.खान यांचे मार्फत शपथेवर सुरु</u> –

०१. आता मला यादी क्र.३/१ वरिल धनादेश दाखविला. त्यावर आरोपीची सही आहे. ती मी ओळखतो. त्याला **नि.१६** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/२ वरिल बँकेचे चलन दाखविले. त्याला **नि.१७** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/३ वरिल रिटर्न मेमो दाखविला. त्यावर बँकेची सही व शिक्का आहे. ती मी ओळखतो. त्याला **नि.१८** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/४ वरिल आर पी ए डी पावती दाखविली. त्याला **नि.१९** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/५ वरिल नोटीस दाखविली. त्यावर माझ्या विधीज्ञांची सही आहे. त्याला **नि.२०** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/६ वरिल पोस्टाची पोहोच पावती दाखविली. ती तिच आहे. त्यास **नि.२१** देण्यात आली.

सरतपास पुर्ण.

**प्रकरण उलटतपासकरिता पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत
जबाब माझे समक्ष व उपस्थितीत नोंदवला.
सही/–
(ई.मो.नाईकवाडी)
दिनांक १४/१०/२०२४ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट नं.०७, अहमदनगर

<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एम.ए.शेख यांचेकडुन शपथेवर सुरु</u> –

०२. मी बील्डींग कन्स्ट्रक्शन सप्लायर्सचा व्यवसाय करतो. आरोपी माझा मित्र आहे. माझे व आरोपीचे घरगुती संबंध आहेत. मी मुश्ताक ईस्माईल तांबोळी यांना ओळखत नाही. प्रकरण दाखल करतांना आरोपीचा अलमगीर येथील पत्ता दिलेला आहे. आता मला

नि.२१ दाखविले. त्यावर केअर ऑफ मुश्ताक ईस्माईल तांबोळी असा पत्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, धनादेशावरिल व पोहोच पावतीवरिल सहया आरोपीच्या नाहीत आणि ते मुश्ताक ईस्माईल तांबोळीच्या आहेत.

०३.   आरोपीला एक लाख रुपये रोखीने लगड यांच्या समक्ष दिले. लगड यांचे संपुर्ण नाव संजय लगड, राहणार श्रीगोंदा तालुका आहे. संजय लगडचे कांदा व्यापारी आहेत. सदरील रक्कम माझ्या घरी नगर येथे देण्यात आली. सदरील रक्कम मी माझ्याकडे उपलब्ध असलेल्या रकमेतुन दिली. माझे एस बी आय बँकेत २० वर्षापासुन खाते आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची चार चाकी गाडी माझ्याकडे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे आरोपीच्या घरी येणे जाणे असल्यामुळे त्याच्या घरातुन त्याच्या नकाळत वादातील धनादेश मी गायब केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की,माझा आणि आरोपीचे पैशाचे देणे घेणे नाही.

**दोन्ही विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत
जबाब माझे समक्ष व उपस्थितीत नोंदवला.
सही/–
(ई.मो.नाईकवाडी)
दिनांक ०६/११/२०२४ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट नं.०७, अहमदनगर

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ९८/२०२४
नि.क्र.०५
नासीर खान वि. शेख रियाज

७

**आरोपी व आरोपीचे विधीज्ञ गैरहजर. करिता उलटतपास नाही असा अ ादेश पारित केला आहे.**

सही/–
(ई.मो.नाईकवाडी)

दिनांक १३/११/२०२४

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट नं.०७, अहमदनगर

**<u>नि.क्र.३६ वरिल आदेशानुसार फिर्यादी नासीर खान यांचा उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.वाय.आर.ठोंबरे यांचेकडुन शपथेवर सुरु</u>** –

०४. माझा बिल्डींग कन्स्ट्रक्शन सप्लायचा व्यवसाय आहे. या व्यवसायाचा पत्ता प्लॉट नं.५, शांतीनगर,सोलापुर रोड, अहमदनगर असा आहे. माझे या व्यवसायासाठीचा जबीझ ए टु झेड सप्लायर्स या नावाने उद्यम आधार आहे. परंतु जी एस टी नंबर नाही. हे म्हणणे खरे आहे की, या व्यवसायामुळे मला बँक व्यवहारांची माहिती आहे.

०५. मी या व्यवसायाकरिता आयकर विवरण भरतो. आरोपीला एक लाख रूपये दिल्याची बाब माझे आयकर विवरणात नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला एक लाख रूपये दिलेले नाही त्यामुळे ते आयकर विवरणात नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा गाडया विक्रीचा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला हयुंदई कंपनीची चार चाकी गाडी क्र.टीएन ३७ डीसी १०८४ विक्री केली होती. हे म्हणणे खरे नाही की, भिंगार कॅम्प पोलीसांनी माझेवर गुन्हा दाखल करून ही गाडी माझेकडुन जप्त केली होती. आता मला नि.क्र.१६ वरिल धनादेश दाखविला. हे म्हणणे खरे नाही की, त्यावरिल सहीची शाई आणि इतर मजकुरातील शाई यात फरक आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर वादातील धनादेश नि.क्र.१६ वरिल सही आणि इतर मजकुरातील अक्षरात फरक आहे.

०६. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा वादातील धनादेश हा गाडीचे व्यवहारात गाडी माझे नावावर होईपावेतो सिक्युरिटी म्हणुन मी आरोपीकडुन घेतलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती गाडी जप्त झाल्यामुळे माझे नावावर होवु शकली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामूळे मी त्या धनादेशाचा गैरवापर करून आरोपीविरूध्द खोटी केस दाखल केली.

०७. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला हातउसने एक लाख रूपये

दिल्याबाबतचा बॉण्ड वगैरे प्रकरणात दाखल केलेला नाही. मी संजय लगड यांचे समक्ष केलेला बॉण्ड दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५.०८.२०२३ रोजी आरोपी हा मला कुठल्याही प्रकारचे कायदेशीर देणे लागत नव्हता. मी संजय लगड यांची साक्ष घेण्यास तयार आहे.

०८. हे म्हणणे खरे नाही की, माझे फिर्यादमध्ये व सरतपासात आरोपीला मी एक लाख रूपये हात उसने दिल्याचे खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला त्या पैशांच्या परतफेडीसाठी वादातील धनादेश दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मी नोटीस पाठविली आणि ती त्याला मिळाली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गाडीच्या व्यवहाराचा सिक्युरिटीसाठी घेतलेल्या धनादेशाचा गैरवापर करून मी आरोपीविरूध्द खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, माझे फिर्याद आणि सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत
जबाब माझे समक्ष व उपस्थितीत नोंदवला.
सही/–
(माधुरी रा.खनवे)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट नं.०४, अहमदनगर

दिनांक १२/११/२०२५